अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग
पुणे महानगरपालिका
जा. क्र.: अति: म.आ(ज) ४२८८
दिनांक: ०६/०३/२०१८

## बैठक इतिवृत्त

पुणे शहरातील पथविक्रेत्यांचे संदर्भात पुणे महानगरपालिकेच्या मा. शहर फेरीवाला समितीची बैठक दि.१६/२/२०१८ रोजी दु. १२.०० वाजता मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांचे अध्यक्षतेखाली मा. महापालिका आयुक्त कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीला खालीलप्रमाणे प्रशासकीय अधिकारी व समिती सदस्य उपस्थित होते.

१) शीतल तेली-उगले - मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
२) डॉ. बसवराज तेली - मा. पोलीस उप आयुक्त, पुणे शहर
३) श्री. अशोक मोराळे - मा. पोलीस उप आयुक्त
४) श्री. माधव जगताप - उप आयुक्त (अतिक्रमण)
५) श्री. युवराज देशमुख - अधिक्षक अभियंता (बांधकाम)
६) श्री. प्रभाकर ढमाले - सहाय्यक पोलीस आयुक्त (वाहतुक)
७) श्री. पी. टी. वारनटि - पोलीस निरीक्षक (वाहतुक)
८) डॉ. मनीषा नाईक - प्र. सहाय्यक आरोग्य अधिकारी
९) शहर फेरीवाला समितीचे सर्व प्रवर्गामधील सदस्य.

सदर बैठकीमध्ये सर्वप्रथम मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांनी शहर फेरीवाला समिती सदस्यांची ओळख करुन घेतली. तद्नंतर मागिल बैठक सभेचे इतिवृत वाचून कायम करण्यात आले. तसेच मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) व मा. उप आयुक्त (अतिक्रमण)यांनी पुणे शहरातील नोंदणीकृत पथविक्रेत्याबाबत सद्यस्थितीत अतिक्रमण विभागाकडून करण्यात आलेले बायोमेट्रीक सर्वेक्षण, नोंदणी, प्रमाणपत्राचे वाटप व नोंदणीकृत फेरीवाल्यांचे पुनर्वसनाकरीता ठरविण्यात आलेल्या हॉकर्स झोनच्या जागा व त्यावर करण्यात आलेल्या पुनर्वसनाबाबत आकडेवारीसह सर्व सदस्यांना करण्यात आलेल्या कामकाजाबाबतची माहिती देण्यात आली. तद्नंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा होऊन पुढीप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

| अ.क्र. | उपस्थित केलेला मुद्दा | बैठकीत झालेली चर्चा | घेतलेले निर्णय |
|---|---|---|---|
| १ | क्षेत्रिय कार्यालयाकडील नोंदणीकृत फेरीवाल्यांचे पुनर्वसनाकरीताच्या पर्यायी जागांना दरपत्रक व दैनंदिन शुल्कांना मा. प्रभाग समितीकडून मंजूर करण्यात आले असून त्यास मंजुरी देणेबाबत. (सोबत जागा व दरपत्रकाची यादी) | शहरामध्ये नोंदणीकृत फेरीवाल्यांकरीता यापूर्वी प्रभाग समित्यांकडून २८८ जागा मंजूर केल्या होत्या. त्यापैकी २१४ ठिकाणी पुनर्वसन करण्यात आलेले असून उर्वरीत जागांबाबत कार्यवाही चालू आहे. तसेच शहरातील पूर्वीपासून व्यवसाय चालू असलेली २२१ ठिकाणे असून सदरची ठिकाणे फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करणे व तेथील जागेचे दैनंदिन शुल्क ठरविणे यास क्षेत्रिय कार्यालयाकडील मा. प्रभाग समितीने मान्यता दिलेली असून सद्य स्थितीत अशा एकूण ४३५ फेरीवाला क्षेत्रे प्रशासनाकडून ठरविण्यात आलेली आहेत. सदर प्रस्तावास समितीची मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव सादर केलेबाबतची माहिती मा. उप आयुक्त (अतिक्रमण) यांनी सर्व सदस्यांना दिली. त्यावर | प्रशासनाने ठेवलेल्या प्रस्तावास जाणिव संघटनेचे श्री. शंके यांचा विरोध वगळता इतर सर्व सदस्यांनी बहुमताने मान्यता दिली. त्यानुसार मा. उप आयुक्त (अतिक्रमण) यांनी पुढील कार्यवाही करणेबाबत मा. अध्यक्ष यांनी प्रशासनास आदेश दिले. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | जाणीव हॉकर्स संघटनेचे श्री. शंके यांनी विरोध दर्शवून राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या योजनेनुसार प्रथम ग्रिव्हीअन्स सेल व्हायला पाहिजे, रस्त्यावर खाद्यपदार्थ शिजवावेत की नाहीत, तसेच योजनेतील तरतुदीनुसार फेरीवाला सदस्यांच्या निवडणूका घेतल्या पाहिजेत, राज्य शासनाने मंजूर केलेल्या धोरणानुसार पुन्हा फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करावे असे विविध बाबींबाबत पुर्तता केल्यानंतर पुढील कार्यवाही करावी असे सुचविले. त्याबाबत मा. उप आयुक्त (अतिक्रमण) यांनी सन २०१४ साली सर्व फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करण्यात आलेले आहे, पुन्हा सर्वेक्षण करता येणार नाही असे पत्र राज्य शासनास पाठविण्यात आलेले आहे. इतर महापालिकांच्या तुलनेने आपले काम १००% पुर्ण झालेले आहे. शासनाच्या योजनेची अमंलबजावणी करणेसाठी ५ ते ६ समिती सदस्यांचा ग्रुप तयार करुन नियमाप्रमाणे कामकाज होते की नाही हे पाहता येईल. तसेच यापुढे समितीची बैठक दर तीन महिन्यांनी घेण्याचा प्रयत्न प्रशासन करणार आहे. तद्नंतर मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांनी सर्व सदस्यांचे म्हणणे ऐकून घेऊन सुचविले की, प्रशासनाने सद्या चालू ठेवलेले काम थांबविता येणार नाही. प्रशासनाने ठरविलेल्या व त्यास संबंधित मा. प्रभाग समित्यांनी मान्यता दिलेल्या पूर्वीच्याच व्यवसाय जागा ह्या नो-हॉकर्स म्हणून घोषित करण्याचा प्रयत्न केला जाईल. अशा जागांवर एकत्रितपणे व्यवसायिकांचे पुनर्वसन करण्यास प्राधान्य देण्यात येत असून सोबतच अनधिकृत व्यवसायिकांवर सातत्याने कारवाई करण्यात येत आहे. | |
| २ | पुणे शहरात अनेक ठिकाणी पूर्वीचे (जुने) परवानाधारकांचे बायोमेट्रिक सर्वेक्षण झाले नसल्याबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत जुन्या परवाना धारकांचेच अर्ज घेऊन त्यांचे बायोमेट्रीक सर्वेक्षण करणेस मान्यता मिळणेस. | शहरातील राहिलेल्या व्यवसायिकांचे बायोमेट्रीक सर्वेक्षण करणेकामी प्रशासनाकडून यापूर्वी जाहिर प्रकटन देण्यात येऊन ३० नोव्हेंबर २०१७ ही अंतिम तारीख देण्यात आलेली होती. परंतु पूर्वीच्या परवानाधारक व्यवसायिकांनी काही गैरसमजूतीमुळे अद्यापही बायोमेट्रीक सर्वेक्षणासाठी अर्ज दाखल केलेले नाही. परंतू कायद्यानुसार त्यांचे सर्वेक्षण करणे आवश्यक असल्याने त्यांना मुदतवाढ द्यावी लागेल. तद्नंतर जाहिर प्रकटनानुसार ८,९३४ अर्ज व दिव्यांगाचे २००० अर्ज असे एकूण १०९३४ अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्याची छाननी करुन | या विषयाबाबत सर्व सदस्यांनी बहुमताने मान्यता दिली. त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करणेबाबत मा. अध्यक्षांनी प्रशासनास आदेश दिले. |

8/

| | | | |
|---|---|---|---|
| | | बायोमेट्रीक सर्वेक्षण करण्यात येणार आहे. बायोमेट्रीक सर्वेक्षण हे जागेवर जाऊन करता येणे शक्य नाही. बायोमेट्रीक सर्वेक्षण करणेसाठी सेंट्रल यंत्रणा ठेवण्यात आलेली आहे. फेरीवाले जो व्यवसाय करणार आहेत, तो महापालिकेचे शुल्क भरुन, महापालिकेने ठरवून दिलेल्या जागेवर, अधिकृत करण्यात यावा. फेरीवाला जितका जुना व्यवसाय करत असेल तर त्याला प्राधान्य देण्यात येईल, अशी मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांनी माहिती दिली. त्यावर काही सदस्यांनी काही जे जुने व्यावसायिक व्यवसाय करतात परंतु त्यांच्याकडे कारवाई मध्ये माल उचलण्यात आलेल्याची पावती किंवा स्वच्छतेची पावती असे पुरावे नसतील तर अशा व्यवसायिकांनी काय करावे? अशी विचारणा केली असता त्यावर(alternative) पर्यायी पुराव्यांचा विचार करता येईल असे अध्यक्षांनी सुचविले. | |
| ३ | ओटा मार्केटमध्ये नोंदणीकृत फेरीवाला व्यावसायिकांचे पुनर्वसन करणेस मंजुरी देणेबाबत. | पुणे शहरामध्ये बीएसयुपी योजनेअंतर्गत यापूर्वी बांधण्यात आलेल्या ओटा मार्केटमधील ओटे/गाळे वाटपाबाबत यापूर्वी मा. महापालिका आयुक्त यांनी ठराव क्र. ६/८६, दि. २३/९/२०११ अन्वये जी कार्यपध्दती अवलंबणेबाबत मान्यता देण्यात आलेली होती, ती सद्याचे केंद्र/शासन फेरीवाला धोरणाचे तरतुदीनुसार अवलंबणे अडचणीचे ठरत आहे. त्यामुळे सदरच्या ठरावाऐवजी सद्या मनपा बांधीव ओटा मार्केट ज्या प्रभागामध्ये उपलब्ध असतील/होतील त्या प्रभागामधील नोंदणीकृत फेरीवाल्यांचे नवीन धोरणअंतर्गत ठरविण्यात आलेल्या पुनर्वसन कार्यपध्दतीनुसार कायमस्वरुपी पुनर्वसन करुन सदर प्रभागाचा परिसर हॉकर्स मुक्त करणे शक्य होईल.त्याकरीता ओटा मार्केट असलेल्या प्रभागामधील फेरीवाल्यांची संख्या कमी पडल्यास त्याच क्षेत्रीय कार्यालयामधील लगतच्या प्रभागामधील नोंदणीकृत फेरीवाल्यांचे प्राधान्यक्रमाने पुनर्वसन करावे. पुनर्वसन केलेल्या ओटा मार्केटमधील व्यवसायिकांकरीता ओटा/गाळ्यांचे दैनंदिन/मासिक शुल्क/भाडे हे संबंधित क्षेत्रीय कार्यालयाचे मा. प्रभाग समितीची मान्यता घेऊन त्याप्रमाणे त्याची वसुली करावी, ओटा मार्केटमध्ये पुनर्वसन हे चिठ्ठया टाकून करण्यात येईल. ज्या फेरीवाल्यांची रितसर नोंदणी करण्यात आलेली आहे | ह्या प्रस्तावास सर्व सदस्यांनी बहुमतानी मान्यता दिली. त्याअनुषंगाने मा. अध्यक्ष यांनी पुढील कार्यवाही करणेबाबत प्रशानास आदेश दिले. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अशाच फेरीवाल्यांना बसविण्यात येणार आहे, असा प्रस्ताव मान्यतेसाठी असलेबाबत मा. उपआयुक्त (अतिक्रमण) यांनी माहिती दिली. त्यावर काही सदस्यांनी ओटा मार्केट असलेल्या प्रभागामध्ये पूर्वीपासून व्यवसाय करीत असलेले परंतु राहणेस इतर प्रभागात असलेल्या व्यवसायिकांना हटविले जाणार का अशी शंका उपस्थित केली. त्यावर ओटे/गाळे देताना जवळचे परिसरातील व्यवसायाचे ठिकाण हा निकष आहे, राहण्याचे ठिकाण नाही, असे प्रशासनातर्फे सांगण्यात आले. | |
| | | **आयत्या वेळेचे विषय** | |
| १ | नो-हॉकर्स झोन वर कार्यालयीन वेळेनंतर संध्याकाळी/रात्री फेरीवाल्यांचे होणारे अतिक्रमण | अतिक्रमण विभाग व पोलीस यंत्रणा यांचेकडे कर्मचारी वर्ग अपूरा आहे. तसेच रितसर फ़ेरीवाल्यांना मनपाने ठरवून दिलेले जागेवर व ठरवून दिलेले शुल्क भरुन पुर्नवसन होईल, तेव्हा कोणताही फेरीवाला नियम व कायदा मोडून व्यवसाय करणार नाही. पुनर्वसन झाल्यानंतर कर्मचारी वर्ग हा अनधिकृत व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई करणेसाठी तत्पर राहिल. | पुनर्वसन झाल्यानंतर अनधिकृत व्यवसाय करणाऱ्यांवरती कारवाई जास्त प्रभावीपणे/सातत्याने करण्यात यावी, असे बैठकीमध्ये सर्व सदस्यांनी केलेल्या चर्चेमध्ये ठरविले. |
| २ | दर/शुल्क कमी करणेबाबत | अ,ब,क श्रेणीनुसार जो दर ठरविण्यात आलेला आहे. त्याऐवजी असा एक दर ठरविण्यात यावा जेणेकरुन २०१४ पासून राहिलेला शुल्क भरता येईल. जे शुल्क भरणार नाहीत त्यांचे प्रमाणपत्र रद्द करुन कारवाई करण्यात यावी, अशी काही संघटनाकडून मागणी करण्यात आली. तसेच शुल्क कमी करण्यात यावेत असे काही संघटनांनी मागणी केली. | जो व्यवसायिक मनपाने ठरवून दिलेले शुल्क भरणार नाही त्यांचेवर नियमानुसार कारवाई करण्यात यावी. शुल्क निश्‍चितीबाबत प्रशासनाने तयार केलेले आराखडा अंतिम करावा. सदर र. रु. ५०/- व २५/- प्रति दिन शुल्क तातडीने भरावे. र.रु. ४००/-, र.रु.२००/- व १००/- प्रति दिन याबाबत निर्णय घेऊन मा.महासभेने नियुक्त केलेले उपसमितीची मान्यता घ्यावी. |
| ३ | सदस्यांना देण्यात येणारे मानधनाबाबत | गेली वर्षभर पुणे महानगरपालिकेने हॉकर्स संदर्भात यशस्वीरित्या कामकाज पार पाडलेले आहे. पुणे महानगरपालिका ही हॉकर्स कामकाजाच्या बाबतीत एक नंबरला आहे असे संघटनांनी मान्य केले. परंतू अजुनही सदस्यांना मानधन देण्यात येत नाही. मानधनाबाबत मान्यता देण्यात आलेली आहे. | १५ दिवसांच्या आतमध्ये सर्व सदस्यांच्या खात्यामध्ये मानधन जमा करण्यात येईल असे मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांनी असा निर्णय दिला. |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | रिमूव्हल चार्जेस व फुड स्टॉलवरती होणाऱ्या कारवाई बाबत | फुड स्टॉल बाबत अन्न व परवाना विभागाचा परवाना असेल आणि कमर्शिअल सिलेंडर वापरण्यात येत असतील त्यांचेवर कारवाई होणार नाही. तसेच दि. २०/१२/२०१७ च्या अगोदर अतिक्रमण कारवाई मध्ये जप्त करण्यात आलेला माल अजूनही सोडण्यात आलेला नाही. | दि. २०/१२/२०१७ च्या अगोदर अतिक्रमण कारवाई मध्ये जप्त करण्यात आलेला माल व तो सोडविण्याचा अर्ज ही त्यापूर्वी प्राप्त झालेला असेल अशा व्यावसायिकांचे जर कोणतेही तक्रार अर्ज असल्यास त्याबाबत कायदेशीर बाबींची पुर्तता करुन मा. महापालिका आयुक्त यांचेकडे वस्तुस्थितीदर्शक प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवला जाईल, प्रस्तावातील आदेशानुसार रिमूव्हल चार्जेसबाबत कार्यवाही करणेत येईल. तोपर्यंत मा. मुख्य सभेच्या मान्यतेनुसार रिमूव्हल चार्जेस भरुन माल सोडण्यात यावा असा निर्णय घेण्यात आलेला आहे. |

वरील निर्णय घेऊन बैठक संपविण्यात आली.

03.03.18

(शीतल तेली-उगले)

अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)

पुणे महानगरपालिका